हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांचा भौगोलिक अभ्यास.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी
पदवी साठीचा शोध प्रबंध आराखडा.

संशोधक

संतोष तुकाराम सोनुले
(एम.ए.बी.एड, नेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.नागदे दैवशाला शिवाजी
भूगोल विभाग प्रमुख
शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी जि.लातूर

जुलै २०२१

हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांचा भौगोलिक अभ्यास.

प्रास्तावना Introduction :-

जगातील पहिले साहित्य वेद, भारतात वेद काळापासून आरोग्याला अधिक महत्व दिले जाते. वेद हे मानव सृष्टीच्या आधी परमेश्वराने मानवाच्या कल्यानासाठी निर्माण केले. म्हणून ते अनादि आहेत अशी वैद्यकांची धारणा आहे.

वेदामध्ये विश्व व अर्थ यांचे अस्तित्व सर्वमान्य आहे. वेद हया मुळ शब्दाचा अर्थ ज्ञान किंवा विद्या असा आहे. यजुर्वेदामध्ये शांतीवर अधिक भर दिलेला आढळतो. ही शांती म्हणजे विश्वशांती होय. विश्व शांती प्रस्थापित व्हावी म्हणून शांतीची आराधना केलेली आहे.

पिंडी ते ब्रम्हांडी पिंड म्हणजे देह ब्रम्हाअर्थात शून्य या शून्यापासून सृष्टीची रचना झाली. सृष्टीच्या निर्मितीमध्ये परमात्माने आपल्या आत्म्यापासून सर्व प्रथम जड आणि जीव ही दोन तत्वे तयार केली.

आपल्या आत्म्यापासून ब्रम्हादेवाने आकाश निर्माण केले. आकाशापासून वायु, वायुपासून अग्नी, अग्नी पासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीपासून औषधी वनस्पती आणि वनस्पती पासून अन्न निर्माण केले. पृथ्वी, जल, वायू, अग्नी व आकाश या पंचमहाभूतानी परिवेष्टीत असलेल्या पर्यावरणाचे महत्व अनादि काळापासून भारतीयांनी जानले आहे.

आरोग्य शास्त्रानुसार सर्व साधारणपणे आपल्या शरीरात ७२ %, आपतत्व, १२ %, पृथ्वी तत्व ६ %, वायुत्व ४ %, अग्नी तत्व आणि ६ %, आकाशतत्व हे संतुलीत प्रमाण आहे. हया प्रमाणाचे संतुलन जेव्हा बिघडते तेव्हा आरोग्याच्या तक्रारी सुरु होतात.

आरोग्य चांगले राहण्यासाठी शास्त्रशुध्द ध्यान धारणेचा उपयोग निरामय आरोग्यासाठी होतो हे सिध्द झाले आहे. निसर्ग चक्रातील बदल संपूर्ण जगात अनुभवले जात आहे.

विज्ञानाला नेहमीच अध्यापनाचा आधार दिला जातो. निसर्गामध्ये समाविष्ट असलेल्या पंचमहाभूता मधील प्रचंड ऊर्जा आपल्या ज्ञान चक्षुनी जाणली तसेच त्यातील सामर्थ्य ही जानले.

पर्यावरणातील हवामान बदल ही समस्या निर्माण होण्यामागे मानव हा एकमेव घटक कारणीभूत आहे. तांत्रिक ज्ञानाच्या प्रगती बरोबर जगात जलद गतीने होऊ लागलेले औद्योगिकीकरण व औद्योगीक क्रांतीपासून मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप वाढला असून औद्योगिकीकरणा बरोबर नागरीकरणातही वाढ झाली आहे. मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर नव नविन शोध लावले आहे.

मानवाचा कल भौतिक सुख साधनाकडे वाढला असून, त्याचा परिणाम हवामान बदलावर झ ालेला दिसून येतो. मानव जीवन जगत असतांना मानवी जीवनावर हवामानाचा परिणाम होत असतो. म्हणून या हवामान बदलाचा परिणाम म्हणून डेंगु चिकन गुनिया, स्वाईनफ्ल्युलू, कोविड १९ , जिवाणू विषाणूमुळे निर्माण होणारे रोग अशा नविन प्रकारच्या रोगांचा मोठया प्रमाणावर प्रसार होतांना दिसत आहे. आरोग्य केंद्रात वेगवेगळया रोगावर कोणत्या वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध आहेत. किंवा वैद्यकीय प्रयोगशाळेमध्ये वेगवेगळे उपाय करुन हे रोग कसे नियंत्रणात आणता येतील याचा शोध प्रस्तुत संशोधन विषयातून घेण्यात येणार आहे.

वैद्यकीय भूगोलाच्या अभ्यासाची सुरुवात इ.स.पूर्व ५ व्या ते ४ थ्या शतकात ग्रीक देशात झाली. ग्रीक लोक ज्ञानाच्या विविध क्षेत्राचे संस्थापक आहेत. ग्रीक विचारवंत हिप्पोक्रेट्स यांनी एखादया ठिकाणाचा हवा, पाणी आणि स्थान याचा परिणाम मानवी आरोग्यावर कसा होतो हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून हिप्पोक्रेट्स यांना वैद्यकीय भूगोलाचा जनक मानले जाते.

इ.स.अकराव्या शतकातील अल बिरुनी हा (परदेशी) जगप्रसिध्द भूगोल शास्त्रज्ञ होता. या शतकावर त्याच्या विचारांचा खोल ठसा होता या कालखंडात 'अल बिरुनी युग ' असे म्हणतात. वैद्यकशास्त्रात तो जाणकार पंडित होता. अनेक भाषावर त्यांचे प्रभुत्व होते.

'किताब अल हिंन्द' हा भारताविषयीचा पहिला ग्रंथ त्याने लिहीला त्यामध्ये सामाजिक परिस्थीती व लोक जीवनाचे वर्णन त्यांने अचुक पध्दतीने केले आहे. वैद्यकीय भूगोल ही मानवी भूगोल या शाखेमध्ये नव्याने विकसीत होत असलेली एक महत्वाची शाखा आहे. मानवास वैद्यकीय सेवा सुविधा केंद्राकडून पुरविल्या जाणाऱ्या सुविधा उदा. आरोग्य विषयक केंद्रे, जागतीक आरोग्य संघटना मानवाचे जीवनमान वाढविण्यासाठी हया संघटना मानवाच्या आरोग्य रक्षणांसाठी कार्य करीत आहेत.

अभ्यासक्षेत्र (Study Area) :- प्रस्तुत संशोधनाकरीता संशोधन क्षेत्र म्हणून मराठवाडयातील हिंगोली जिल्हयांची निवड करण्यात आलेली असून इतर जिल्हया प्रमाणे हिंगोली जिल्हयांची ऐतिहासिक पार्श्वभूमी ही वेगळी आहे.

हिंगोली जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार १९°.०५ उत्तर ते २०°.०५ उत्तर अक्षवृत्तीय व ७६°.३० पुर्व ते ७७°.३० पूर्व रेखावृत्तीयच्या दरम्यान विस्तारलेला आहे. अभ्यास क्षेत्राला उत्तरेकडून वाशिम जिल्हा , पश्चिमेकडून परभणी जिल्हा व जालना जिल्हा दक्षिणेकडून तर पुर्वेकडून नांदेड जिल्हयाच्या सीमा लाभलेल्या आहेत.

हिंगोली जिल्हांचे क्षेत्रफळ ४,८२७ चौ.कि.मी. असून महाराष्ट्रराज्याच्या चौ.की.मी. क्षेत्रफळाच्या तुलनेत १.५७ इतके आहे. या जिल्हयाची एकूण लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ११,७७,३४५ एवढी आहे. तसेच लिंग गुणोत्तरामध्ये हिंगोली जिल्हयातील दरहजारी पुरुषांमागे स्त्रीयांची संख्या ९४२ इतकी आहे, हिंगोली जिल्हयातील साक्षरता ७८.१७ आहे. जिल्हयात एकूण पाच तालुके आहेत. त्यामध्ये हिंगोली, वसमत, कळमनुरी, औंढा नागनाथ व सेनगांव यांचा समावेश आहे. तसेच ६७५ ग्रामीण वसाहती आहेत. अभ्यास क्षेत्राचे सरासरी तापमान ३३.४४°C असून उन्हाळयातील तापमान ४१.९°C तर कधी कधी तापमानात वाढ होऊन तापमान ४४ °C ते ४५.०°C वाढते हिंगोली जिल्हयातील पावसाळया व्यतिरिक्त सर्वसाधारणपणे हवामान कोरडे असते. हा प्रदेश उष्णकटिबंधीय प्रदेशात येत असून पर्जन्यमान ७५० ते १२०० मी.मी. च्या दरम्यान आढळते. हिंगोली जिल्हयाच्या मध्यभागी हिंगोलीचे डोंगर पसरलेले असून उर्वरीत भाग सपाट व सुपीक जमीनीचा आहे. तर समुद्रसपाटी पासूनची उंची ३६० ते ५४० मीटरच्या दरम्यान आढळते. हिंगोली जिल्हयातून पैनगंगा, कयाधू, पुर्णा, आसना हया नदया गोदावरी नदीच्या महत्वाच्या उप नदया या प्रदेशात वाहतांना आढळतात.

महाराष्ट्रराज्य मराठवाडा विभाग राज्य पूर्नरचनेच्या निजाम कालीन संस्थानात हिंगोली उपविभाग हा तात्कालीन ब्रिटीश राजवटीच्या विदर्भ भागास लागून असलेला भूभाग निजाम संस्थानाच्या सिमेवरील

भाग म्हणून ओळखला जात. हिंगोली येथे तात्कालीन निजामाचे लष्करी ठाणे, लष्करी तुकडया, लष्कराचे दवाखाने, घोडदळ व लष्कराच्या उपचारांसाठी दावाखाना येथे आहे.

इ.स. १८०३ मध्ये टिपू सुलतान मराठा युध्द इ.स.१८५७ मध्ये नागपुरकर भोसले यांची लढाई जनतेने पाहीली अनुभवली आहे. आर्मी व मराठी सेनेने इंग्रजाचा केलेला यशस्वी प्रतिकाराचीही येथील जनता साक्षी आहे. हिंगोली येथे असलेल्या लष्कर छावणीमुळे हे शहर पूर्वी पासून हैद्राबाद राज्यातील महत्वाचे शहर असून प्रसिध्दी पावलेले आहे. लष्करी ठाणे असलेल्या या शहरातील वस्त्यांना पूर्वीपासूनची प्रचलित असलेली फलटन, रिसाला, तोफखाना, पेन्शनपुरा, सदर बाजार ही नांवे आजही कायम आहे.

प्राचिन काळात विंगुली असा उल्लेख हिंगोली जिल्हयाबदल आढळतो. इ.स.४९० मध्ये वाकाटक घराण्यातील सर्वसेन राज्याने हिंगोली येथे एक शाखा स्थापन केली नंतरच्या काळात कलचूरी, राष्ट्रकुट चालुक्य, यादव या घराण्यांच्या सत्ताही या प्रदेशात राज्य करीत होत्या पुढे स्वातंत्र्योत्तर काळात १९५६ साली झालेल्या राज्य पुर्नरचनेत मराठवाडा विभाग तत्कालीन मुंबई राज्यास जोडण्यात आला. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर तत्कालीन परभणी जिल्हयाचा हा भाग महाराष्ट्र राज्याचा घटक झाला. महाराष्ट्र राज्याच्या ३९ व्या वर्धापन दिनी म्हणजे १ मे १९९९ रोजी आकाराने विस्तीर्ण असलेल्या परभणी जिल्हयाचे विभाजन करुन हिंगोली हा नविन जिल्हा निर्माण करण्यात आला आहे. परभणी जिल्हयापासून ७८ किमी तर नांदेड जिल्हा पासून ९० कि.मी. अंतरावर हिंगोली जिल्हा सेंट्रल डेक्कन रेल्वे मार्गाने जोडलेला आहे.

शहरापासून जवळच जलेश्वर हे मंदीर आहे. विस्तीर्ण तळयाच्या परिसरात वसलेले असून तलावात विविध रंगाची कमळाची मनमोहक फुले असल्यामुळे हा परिसर निसर्गरम्य झाला आहे.

हिंगोली जिल्हयाची पर्यटनाकडे वाटचाल सुरु असून दसरा महोत्सवाची देश पातळीवर दखल घेतली गेली आहे. दसरा महोत्सव देशवासियांसाठी आकर्षण ठरला आहे. देशातील कर्नाटक राज्यातील म्हैसूर नंतर महाराष्ट्र राज्यामध्ये हिंगोली येथील दसरा महोत्सव प्रसिध्द आहे. म्हैसूरच्या दसऱ्याला

राजाश्रय लाभला तर हिंगोलीच्या दसऱ्याला लोकाश्रय लाभला आहे. शहराच्या मध्यभागी असलेल्या सध्याच्या रामलिला मैदानावर दसरा महोत्सवाचे भव्य प्रमाणात आयोजन होत आहे.

भारतातील बारा प्रसिध्द ज्योर्तिलिंगापैकी एक औंढा नागनाथ हे ८ वे जोतिलिंग आहे. या मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी असून मुख्य मंदिरा भोवती बारा जोर्तिलिंगाचे लहान लहान मंदिरे आहेत. याठिकाणी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते हे हिंगोली जिल्हयातील धार्मीक ठिकाण २२ कि.मी. वर आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे भव्य विश्रामगृह राहण्यासाठी उपलब्ध आहे. जवळच १ कि.मी. औंढा नागनाथ निसर्गरम्य उद्यान उभारलेले आहे. ते निसर्गाच्या सानिध्यात असल्यामुळे खुपच मनमोहक आहे. या शिवाय औढा वसमत तालुक्याच्या सिमेंवर बाराशिव हनुमान मंदिर असून मंदिरांच्या जागा परिसरातील १२ गावांची सिमा एकाच ठिकाणी येतात म्हणून बाराशीव मंदिर असे नाव पडले आहे.

हिंगोली जिल्हयातील नर्सी येथे वारकरी संप्रदायाचे संत श्री नामदेव महाराज यांची जन्मभूमी नर्सी असून कयाधू नदीच्या काठी वसलेले आहे. येथे आषाढी एकादशीच्या दिवशी मोठी यात्रा भरते याला प्रति पंढरपूर म्हणून नर्सीची ओळख आहे. व कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा येथील जटाशंकराचे मंदिर व लमाणदेव यात्रा, हजरत सय्यद नुरोद्यीन उर्फ नुरीबाबा यांचा दर्गा, चिरागशाहा तलाव आदि धार्मीक व प्रेक्षणीय स्थळे पाहता हिंगोली जिल्हयाची पर्यटनाकडे वाटचाल सूरु आहे.

विषय निवडीची प्रेरणा व महत्व :-

अभ्यासासाठी निवडलेले क्षेत्र व विषय हा सध्याच्या परिस्थितीत संशोधनाचा विषय आहे. पर्यावरणातील हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या मानवी समस्या, दुष्काळ, रोगराई, अवर्षनग्रस्त प्रदेश ई. घटकांचा परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. तसेच तांत्रिक ज्ञानाच्या प्रगती बरोबर जलद गतीने वाढणारे औद्योगिकरण व झपाटयाने वाढणारी लोकसंख्या ई. घटकांचा परिणाम मानवाच्या सामाजिक आर्थिक, राजकीय घटकावर परिणाम होत आहे. लोकसंख्या वाढीचा परिणाम हा आरोग्य केंद्रावर झ ाालेला बघायला मिळतो. वाढत जाणारी आजारांची संख्या व त्या तुलनेमध्ये उपलब्ध असणाऱ्या आरोग्याविषयी सेवा सुविधा यात फार मोठी तफावत आपल्याला जाणवते.

एखादया रोगाची साथ आली की, प्रत्येक सेवा केंद्रासमोर रोग्यांच्या रांगा बघायला मिळतात. उदा.कोविड १९ आणि सेवे अभावी बऱ्याच रुग्णांचे जीव धोक्यात येवून त्यांना जीव गमवावे लागतात. प्रत्येक रोगाविषयी जनजागृती केली तर आरोग्य केंद्रावरच्या रांगा कमी करता येतील. व बऱ्याच रुग्णांचे जीव सुध्दा वाचवता येतील. शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टीने व्यवस्थीत आणि रोग मुक्त असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य होय. निरोगी शरीर ही मानवाची संपत्ती मानली जाते.

भारत हा खेडयांचा देश असून येथे मोठया प्रमाणावर शेती केल्या जाते. शेती मध्ये साधारण ७०% लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. शेती ही अत्यंत पारंपारीक पध्दतीने केली जात असल्यामुळे उत्पादन सुध्दा कमी प्रमाणात मिळते. मिळणाऱ्या उत्पादनापैकी जर बराचसा खर्च आरोग्यावर केला जात असले तर प्रति व्यक्ती उत्पादनात घट होईल पण आरोग्यावर होणारा खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला तर (G.D.P) दरडोई उत्पादनात वाढ होऊन आपला देश आर्थिक महासत्ता बनण्याच्या दृष्टीने समृध्द होईल व लोकसंख्येच्या जन्मदरात वाढ होईल हे महत्व लक्षात घेवुन हा विषय निवडण्यात आला आहे.

प्रस्तुत विषयाची अपरिहार्यता व महत्व पाहता हा विषय संशोधनासाठी निवडावा याची नितांतता वाटली म्हणून **'हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांचा भौगोलिक अभ्यास'** हा विषय पिएच.डी. संशोधनासाठी निवडला आहे. हा भाग माझ्या जन्म भूमीचा माझा अंश राहिल्याने परिसरातील अनेकविध पर्यावरणीय घटीतांचा चढउतार मी अनुभवलेला आहे.

महाराष्ट्रराज्याच्या पुर्वेस व मराठवाडयाच्या उत्तरेस हिंगोली जिल्हा आहे. निजाम काळातील लष्करी छावणी असलेला जिल्हा हिंगोली येथे लष्करातील जवांनासाठी वैद्यकीय उपचार करण्याचे ठिकाण हिंगोली हे आहे.

थोडक्यात हिंगोली जिल्हा **१ मे १९९९** रोजी परभणी जिल्हयातून विभाजन होऊन हिंगोली जिल्हयांची निर्मिती झाली. औद्योगिक दृष्टया मागासलेला जिल्हा म्हणून हिंगोली जिल्हयाची ओळख आहे. निसर्गाच्या असमतोल ते मुळेच जिल्हयांतील दुष्काळ, अवर्षनग्रस्त प्रदेश, लोकसंख्या, हया घटकांचा

विचार करुन माझ्या सारख्या भूमिपुत्रांना अस्वस्थ व चिंतन करण्यास भाग पाडते. बऱ्याच दिवसापासून चिंतनाच्या पातळीवर घोळत असलेला हा विषय आपल्या संशोधनाचा भाग बनावा ही तीव्र इच्छा होती याच तिव्रतेतून सदरील विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची ध्येय आणि उद्दिष्टये (Aims and objective of the study) :-

प्रस्तुत संशोधनाकरीता काही उद्दिष्टये ठरविण्यात आलेली आहेत. या उदिष्टांचा अधार घेवुन संशोधन शोधप्रबंध सादर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात येणार आहे.

१. हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांचा अभ्यास करणे.

२. जिल्हयातील आरोग्यकेंद्रे व भौगोलिक घटक यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करणे.

३. आरोग्य केंद्रांतील वितरण बदलाचा अभ्यास करणे.

४. आरोग्य केंद्रांतील सुख सुविधा व शासकीय योजनांचा आभ्यास करणे.

५. आरोग्यावर होणाऱ्या आजारावरील उपाययोजनांचा शोध घेणे.

६. आरोग्य केंद्रांतील वाहतुक व दळवळणाची भूमिका स्पष्ट करणे.

गृहितकृत्ये (Hypothesis of the Study) :-

प्रस्तुत संशोधनात पुढील गृहितकृत्ये संशोधकांने निश्चित केलेली आहेत.

१) वाढत्या लोकसंख्येचा आरोग्य केंद्रांवर भार पडतो.

२) आरोग्य केंद्रांचे वितरण असमान आहे.

३) आरोग्य केंद्रांत आत्याआधुनिक सेवा सुविधा उपलब्ध नाहीत.

४) आरोग्य केंद्रां अंतर्गत सुनियोजीत वाहतुक व दळणवळणाचा आभाव आहे.

५) आरोग्य केंद्रांतील कर्मचाऱ्यांची संख्या मंजूर पदापेक्षा कमी आहे.

माहितीचे संकलन आणि संशोधन पध्दती (Collection of data and Research Methodology):-

संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्वरुपाच्या आधार समाग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक स्वरुपाची सामुग्री ही प्रत्यक्ष आरोग्य केंद्रास भेटी देवून प्रश्नावली व मुलाखतीद्वारे घेतली जाणार आहे. नमुना सर्वेक्षणासाठी काही आरोग्य केंद्राची निवड करुन माहिती संकलीत करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीसाठी हिंगोली जिल्हा जनगणना अहवाल इ.स.२००० ते २०१० ते इ.स.२०११ ते २०२१ हिंगोली जिल्हयातील सामाजिक व आर्थिक समालोचन इ.स. २०११ ते २०२० हिंगोली जिल्हा गॅझेटीअर, आरोग्य विषयक अहवाल, आरोग्य विभागातील आरोग्य विषयक कायदे, जनजागृती, ध्ययेधोरणे, वार्षीक अहवाल, राष्ट्रीय डिझीटल आरोग्य प्राधिकरण व वर्तमान पत्रातील बातम्या, इंटरनेट इत्यादी विविध संदर्भ ग्रंथाच्या माध्यमातून विविध ग्रंथ मासिके, संशोधन पत्रिका प्रकाशीत अप्रकाशीत शोध प्रबंध इत्यादीचा करण्यात येणार आहे.

अभ्यास पध्दती (Research Methodology) :-

प्रस्तुत संशोधनासाठी मिळवण्यात आलेल्या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साहयाने करण्यात येणार आहे हे विश्लेषण करण्यासाठी सर्वेक्षण पध्दती, योग्य अशी सांख्यिकी पध्दती, ऐतिहासिक पध्दती, तंत्र यानुसार अभ्यास करण्यात येणार आहे. आरोग्य केंद्राचे वितरण दर्शवण्यासाठी नकाशा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

१) प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्हयापुरते मर्यादीत आहे.

२) प्रस्तुत संशोधन हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांशी संबंधीत आहे.

३) प्रंस्तुत संशोधन हिंगोली जिल्हयातील भौगोलिक अभ्यासाशी संबंधीत आहे.

४) प्रस्तुत संशोधनाचा कालावधी इ.स. २००० ते २०१० ते इ.स. २०११ ते २०२१ या वर्षातील आरोग्य केंद्रांच्या वितरण बदलातील स्वरुपाचा असणार आहे.

१.१७ साहित्याचे पुनरावलोकन :- (Review of Literature)

आरोग्य भूगोल' ही मानवी भूगोलाची अलिकडील काळात विकास पावलेली मानवी आरोग्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण शाखा मानली जाते. मानवी आरोग्याशी संबंधित अनेक घटकांचे भौगोलिक दृष्टिकोनातून विश्लेषण या शाखेत केले जाते. विविध भूगोल तज्ज्ञांनी आरोग्य भूगोलाशी संबंधीत घटकांचा अभ्यास केलेला आहे. त्यामुळेच या शाखेचा विकास झालेला पहायला मिळतो. **'हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांचा भौगोलिक अभ्यास'.** या आरोग्य भूगोलाशी संबंधित विषयावर संशोधन करत असतांना विविध भूगोल संशोधकांच्या ग्रंथाचा, प्रकाशित व अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंधाचा इंटरनेटवरील व जर्नल मधील विविध शोधनिबंधाचा आढावा घेतलेला आहे. त्यापैकी काही साहित्याचा आढावा पुढील प्रमाणे आहे.

१) **मानकरी एम.पी.** यांनी "A Comparative Geographical Analysis of Health Care Facilities in Bidar and Dharwad District" या विषयावर पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केलेले आहे. या शोधप्रबंधात त्यांनी बिदर व धारवाड या दोन जिल्हयातील आरोग्य सुविधांचे तुलनात्मक विश्लेषण केलेले आहे. आरोग्य सेवा केंद्राचे इ.स.१९९१ व २००१ या दहा वर्षातील वितरणातील बदल, आरोग्य केंद्राचे तालुकानिहाय वितरण, वेगवेगळया आरोग्य केंद्राचे त्यांच्या दर्जानुसार असलेले कार्य, आरोग्य केंद्राचे लोकसंख्येशी, क्षेत्रफळाशी असलेले प्रमाण यांचे विश्लेषण केलेले आहे. तसेच अभ्यास क्षेत्रात आढळणाऱ्या विविध रोगांचा अभ्यास केलेला आहे.

२) **डॉ.एच.बी.राठोड, डॉ.एस.एच. गोने, प्रा.ए.ए.काळगापुरे व बी.एन. नागलगावे** यांनी मुखेड तालुक्यातील आरोग्य केंद्रातून मिळणाऱ्या सुविधांचे बदलते स्वरुप : एक भौगोलिक अभ्यास या शोधनिबंधातून आरोग्य केंद्राचे पदानुक्रमे वितरण (१९९१-२००१) व विविध आरोग्य केंद्रातून मिळणाऱ्या सुविधांचे विश्लेषण केलेले आहे.

३) **शेलार सुरेश के.** यांनी ' Impact of Climate on Malaria in Dhule District (Maharashtra)' या शोधनिबंधामध्ये त्यांनी हवामानाचा मलेरीया आजारावर होणारा परिणाम

तसेच धुळे जिल्हयातील इ.स.२००९ या वर्षात मलेरीया रोगाची लागण झालेली व्यक्तीचा मासिक आढावा घेतलेला आहे.

४) **लांजेवार एच.डी.** यांनी "गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे आरोग्य व आजार एक वैद्यकीय भूगोल अध्ययन" या विषयावर पीएच.डी. चे संशोधन कार्य पूर्ण केलेले आहे. या शोधपबंधात त्यांनी गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोकांच्या अज्ञानीपणामुळे व मागासलेपणामुळे त्यांच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो हे अभ्यासले आहे. तसेच आदिवासींच्या आरोग्यावर परिणाम करणारे घटक, अभ्यास क्षेत्रामध्ये उदभवणारे विविध आजार व आजारावर मात करण्यासाठी पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतलेला आहे.

५) **सिंघई जी.सी.** यांनी 'चिकित्सा भूगोल' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात वैद्यकीय भूगोलाचा अर्थ, व्याख्या, विकास, व्याप्ती, वातावरण व आरोग्याचा संबंध, कुपोषण, मानवी संबंधित रोग, पचनसंस्थेशी संबंधीत रोग, लैगिंकतेशी संबंधित रोग, वातावरणीय रोग, व्यवसायाशी संबंधीत रोग व आरोग्य सेवा पध्दती ई. घटकांचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

६) **मेलिंडा एस.मीडे व रॉबर्ट जे. इरीक्सन** या दोघांनी मिळून "Medical Geography" हाग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी वैद्यकीय भूगोलाचा विकास, मानवाच्या आरोग्यावर परिणाम करणारे घटक, विविध रोगाची उत्पत्ती व प्रसार, आरोग्य विषयक सुविधांचा विकास इ. आढावा घेतलेला आहे. तसेच विविध खंडातील काही महत्वाच्या देशामध्ये आरोग्यावर एकूण उत्पन्नाच्या किती टक्के खर्च केला जातो. व एक डॉक्टर किती लोकसंख्येला सेवा पुरवितो याचाही आढावा घेतलेला आहे.

७) **प्रा.विजय बैसाणे** यांनी औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण आरोग्य सेवा सुविधांचा भौगोलिक अभ्यास या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केलेले आहे. या शोधप्रबंधात त्यांनी औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून शासनाकडून मिळणाऱ्या आरोग्य सेवा

सुविधा व ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्याविषयक असलेल्या समस्यांचा अभ्यास केलेला आहे.

८) **देवेंद्रकुमार नायक** यांनी "Spatial Patterns of Health Care in the Khasi Hills of Meghalaya" या विषयावर शोधनिबंध लिहिला. या शोधनिबंधात त्यांनी मेघालयातील खासी टेकडयामधील आरोग्य सेवांचे विश्लेषण केलेले आहे. त्या मध्ये १९८१ ते २००१ पर्यंत त्या प्रदेशात झालेली आरोग्य केंद्रातील वाढ, आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या विविध सुविधा, आरोग्य केंद्र व गावातील अंतर, आरोग्य केंद्राचे स्थान व वितरण यांचे सविस्तर संशोधन केलेले आहे. भूपेंद्रसिंग यांनी " A Study of Spatial Variations of Medical Centers in Haryana, India" या शोधनिबंधात हरियाणा राज्यातील १९८१ ते २००१ या वीस वर्षातील आरोग्य केंद्रात झालेल्या बदलाचा अभ्यास केलेला आहे. तसेच लोकसंख्या व खाटांचा संख्या याच्या गुणोत्तराचाही अभ्यास केलेला आहे.

९) **पुल्लाराव डी.** यांनी " Health Development in India- A Review" या शोधनिबंधामध्ये भारतातील इ.स.१९५१ ते इ.सन. २००५ या मालावधीमध्ये दर एक लाख लोकसंख्येला डॉक्टर्स, नर्स, दवाखाने व खाटा किती आहेत व त्यामध्ये कसा बदल झालेला आहे याचे विश्लेषण केलेले आहे.

१०) **कदम रवी एन.** यांनी "Dimensions of Healh Services in India : Efforts and Achievements" या शोधनिबंधामध्ये त्यांनी भारताती इ.स.१९५१ ते इ.स.२००४ या कालावधीतील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने व खाटांची संख्या यामधील बदलाचा अभ्यास केलेला आहे. तसेच भारतातील इ.स.१९५०-५१ ते इ.स.२००९-१० या कालावधीतील जन्मदर व मृत्यू दरातील बदलाचा आढावा घेतलेला आहे.

११) **माजीद हुसेन** यांनी "Medical Geography" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये वैद्यकीय भूगोलाचा विकास व व्याप्ती, आरोग्य व रोगाची संकल्पना, पर्यावरण व मानवी आरोग्य इ. चे विश्लेषण केलेले आहे. अहमद हुसेन यांनी "Geography of Health" हा ग्रंथ लिहला या

ग्रंथामध्ये त्यांनी आरोग्य भूगोलाचा विकास, मूलभूत आरोग्य सुविधा, विविध रोग, कुपोषण व प्राथमिक आरोग्य सेवेंचा आढावा घेतलेला आहे.

संशोधन प्रकरणाचे नियोजन (Scheme of Chapter) :-

प्रकरण १ ले

१.१ प्रस्तावना

१.२ विषयाची पार्श्वभूमी / निवड

१.३. संशोधनाच्या संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या

१.४ संशोधन विषयाचे क्षेत्र

१.५ संशोधन सामग्री

१.६ संशोधनाचे महत्व

१.७ संशोध अभ्यास पध्दती आणि माहिती संकलन

१.८ संशोधन पुर्व साहित्याचा आढावा.

प्रकरण २ रे हिंगोली जिल्हयाची भौगोलिक सांस्कृतिक पार्श्वभूमि :

२..१ प्रास्तावना

२.२ स्थान विस्तार

२.३ प्राकृतीकरचना

२.४ हवामान

२.५ तापमान

२.६ पर्जन्यमान

२.७ वनस्पती / (जंगले व अरण्ये)

२.८ नदी प्रणाली

२.९ मृदा खनिजे

ब) सांस्कृतिक :

२.१ प्रस्तावना

२.२ भूमि उपयोजन संकल्पना

२.३ ग्रामीण व शहरी लोकसंख्या

२.४ वाहतुक व संदेशवहन

२.५ स्थलांतर

२.६ उद्योगधंदे

२.७ बाजार पेठ

२.८ धार्मीक व सांस्कृतीक पर्यटन व उदयाने

प्रकरण ३ रे हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रें :

३.१ प्रस्तावना

३.२ प्राथमिक आरोग्य केंद्र

३.३ जिल्हा शासकीय रुग्णालय

३.४ आरोग्य केंद्रांतील सुख सुविधा

३.५ लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य केंद्रांतील कर्मचाऱ्यांचे प्रमाण.

३.६ आरोग्य क्षेत्रात वाहतुकीची भूमिका व संदेशवहन

३.७ आरोग्य केंद्रांमध्ये संगणकाचा उपयोग

प्रकरण ४ थे हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांचे स्थान व वितरण :

४.१ प्रस्तावना

४.२ आरोग्य भूगोलाचा अर्थ व व्याख्या

४.३ आरोग्य म्हणजे काय ?

४.४ मानवी आरोग्यावर परिणाम करणारे घटक

i) नैसर्गिक ii) सामाजिक

४.५ हिंगोली जिल्हयातील आरोग्य केंद्रांची वाढ व वितरण

४.६ आरोग्य केंद्रातील संकलित माहितीचे पृथःकरण व संश्लेषण

४.७ उद्दिष्टानुसार विश्लेषण

प्रकरण ५ वे सारांश निष्कर्ष व शिफारशी

५.१ प्रस्तावना

५.२ निष्कर्ष

५.३ उपाययोजना/ शिफारसी

टिप : संशोधनाच्या प्रगती कार्यानुसार संशोनात आवश्यक ते बद्ल केले जातील.

संदर्भ सूची :-

१) Socio- economic Criticism of Hingoli District (२०२०).
२) Census Report in Hingoli District (२०११).
३) Government of Maharashtra Hingoli District Statistical Office Information Report (२०२०).
४) Hingoli District - Wikipedia,
- **i) https:// hingoli.nic.in.**
- **ii) https:// vishwakosh, marathi.org-**
- **iii) http:// mr. vikaspedia.in health.**
- **iv) http:// mr vikaspedia.in>education.**
- **v) http:// mr.m.wikipedia.org>wiki.**
- **vi) http:// www loksatta.com>Importance.**

५) **Majid Husain (१९७४) Medical Geography Anmol Publication New Delhi.**
६) **Prof.Dr.Kachole R.D.(२०१५) Social Resorach methods Kailas Publication.**
७) **B.R. Gunde and Dr. V.T. Naik - Frequently occurring Diseuses in Beed District : A Geographical Analysis, consmos multidisciplinary Research E Journal, December (२०२०).**
८) **Misra R.P. (१९७०) Medical Grography of India, New Delhi national Book Trust.**
९) **Mankari M.P. - A Comparative Geographical Analysis of health care facilities in Bidar and Dharwad District, Unpublished Ph.d.. Thesis, Karnataka University, Dharwad.**
१०)**Singhai G.C. (१९९९) - Environment Nutrition and health hazards in India, Vohra Publication, Allhabad.**
११)**Nayak D.K. (२००४) Spacial Pattern of health care in the Khashi Hills of Meghalaya, the Deccan Geographer, VD/४२ no. १ June २००४.**
१२)**Singh Bhupendra (२००४) - A study of Spatial variations of medical center in Haryana., India, The Deccan Geographer, VO/४२ No.१ June २००४.**
१३)Shelar S.K. (२०१२) Introduction or medical Geography, Kanpur Chandrolok Prakashan.
१४) Mrs. Mane Parvati Vinayak - २०१६ her Ph.d. research work has been completed on A study of health care facilities and frequently occurring diseases in Sangali District : A Geographical Analysis, Hold a Ph.d. from S.R.T.M. University Nanded.
१५) प्रा.डॉ.काचोळे, रा.धों. (२०१५) सामाजिक संशोधन पध्दती कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
१६)प्रा.डॉ.विठ्ठल घारपुरे (२०१३) भूगोलशास्त्र : विचार संकल्पना पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर
१७) लांजेवार एच.डी. : गडचिरोली जिल्हयातील आदिवासीचे आरोग्य व आजार एक वैद्यकीय भूगोल अध्ययन अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध.

१८)	वीरकपाळे सुनिल नरसप्पा : उस्मानाबाद जिल्हयातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा भौगोलिक अभ्यास अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेङ

१९)डॉ.भोयर देविदास निळंकठ (२०१९) वाशिम जिल्हयातील मानवी आजार आणि वैद्यकीय सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास प्रकाशीत पीएच.डी. शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

२०)	डॉ.फड प्रल्हाद भागवत (२०२१) परभणी व गंगाखेड आरोग्य सुविधाचा तौलीनक अभ्यास प्रकाशीत पी.एच.डी. शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

२१)प्रा.जाधव अविनाश हरी (२०१८) यवतमाळ जिल्हयातील आरोग्य सुविधांचा भौगोलिक अभ्यास प्रकाशीत पीएच.डी. शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधक
संतोष तुकाराम सोनुले
(एम.ए.बी.एड.नेट)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.नागदे दैवशाला शिवाजी
भूगोल विभाग प्रमुख
शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी जि.लातूर